# पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे

**Pune Metropolitan Region Development Authority, Pune**

PUNEMETROPOLIS

पिंपरी -चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, आकुर्डी, पुणे-४४

Pimpri - ChinchwadNavanagar Development Authority, Akurdi, Pune.

Ph No. : 020- 259 33 344 / 356 / 333 / फोन नं. : ०२०- २५९ ३३ ३४४ / ३५६ / ३३३

Email: osd.pmrda@gmail.com


AD ले.सा.रिम/ ०८.२०/ प्र.क्र. ३९/ शाखा-१

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
प्रशासन विभाग, पुणे,
दि. २१.०९.२०२०

प्रति,

-------------------------------------------

-------------------------------------------

-------------------------------------------

**विषय :- पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे, कार्यालयासाठी दि. ०१/१०/२०२० ते ३०/०९/२०२१ या कालावधीसाठी आवश्यक झेरॉक्स रिम ( A - 4 - ७०GSM) खरेदी करण्यासाठी दरपत्रके मागविणेबाबत.......**

महोदय,

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे कार्यालयास दि. ०१/१०/२०२० ते ३०/०९/२०२१ या कालावधीसाठी सोबत जोडलेल्या सूचीमधील कार्यालयीन झेरॉक्स रिम (A4- 70 GSM) याचा खालील अति व शर्ती यांच्या अधीन राहून पुरवठा करण्याकरिता आपणाकडून दर पत्रक मागविण्यात येत आहेत. तसेच महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१९/प्र.क्र. २१५/ उद्योग-४, दि. २४ ऑगस्ट २०१७ नुसार ज्या वस्तू GeM पोर्टलवर उपलब्ध आहेत, त्या तेथूनच खरेदी करणे व ज्या वस्तू GeM पोर्टलवर नाहीत अथवा त्याचे पुरवठादार उपलब्ध नाहीत त्या वस्तू दरपत्रकाद्वारे दर निश्चित केलेल्या दरपत्रकाद्वारे पुरवठादाराकडून मागविण्यात येतील.

1) दरपत्रक हे मा. अतिरिक्त आयुक्त तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशासन), पुणे, पुमप्रविप्रा, यांचे नावे देण्यात यावे.
2) दरपत्रक सादर करण्याची मुदत दि. २८.९.२०२० रोजी १७.३० पर्यंत राहील.
3) उपरोक्त मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके दि. २९.०९.२०२० सकाळी ११.३० वाजता मा. उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दालनात दरपत्रक समिती समोर उघडण्यात येतील. दरपत्रके उघडण्याच्या वेळी पुरवठादार यांना स्वत: उपस्थित राहता येईल किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधीला दरपत्रके




Scanned with CamScanner

उघडण्याच्या वेळी उपस्थित राहता येईल. तथापि, सदर प्रतिनिधीकडे पुरवठादार अधिकार पत्र असणे आवश्यक आहे. अन्यथा त्यास उपस्थित राहण्यास अनुमती दिली जाणार नाही.

4) दरपत्रक सीलबंद लीफाप्यात सादर करावे दरपत्रक लिफाफ्यावर दि. ०१/१०/२०२० ते ३०/०९/२०२१ झेरॉक्स रिम (A-4 ७० GSM) लेखन सामुग्रीचा पुरवठा करण्यासाठी दरपत्रक असे नमूद करावे.
5) उपरोक्त मुदतीनंतर प्राप्त झालेले दरपत्रक विचारात घेतले जाणार नाही.
6) दरपत्रक पुरवठादाराने त्याचे लेटर हेडवरच सादर करणे आवश्यक आहे.
7) उपरोक्त लेटर हेडवरच पुरवठा दाराने GSTN रजिस्ट्रेशन न. नमूद करावा.
8) दरपत्रका सोबत PANCARD ची छायांकित परत जोडणे आवश्यक आहे.
9) अनुपस्थित असणाऱ्या पुरवठारांना नंतर दरपत्रके मागविणे, उघडणे व स्वीकृत करणे याबाबत तक्रार/हरकती करता येणार नाही.
10) उघडण्यात आलेल्या दरपत्रकातील सर्वात कमी दर (एल-१) बाब निहाय स्वीकृत करण्यात येतील.
11) ज्या पुरवठादारांची बाब्निहाय दर पत्रके स्वीकृत करण्यात येतील त्यांना विषयांकित कालावधीत दर पत्रकात नमूद करण्यात आलेल्या दराने पुरवठा करणेबाबत बंधपत्र सादर करावे लागेल, सदर बंधपत्र सादर झाल्यानंतर त्यांना वेळोवेळी आवश्यकतेनुसार पुरवठा आदेश देण्यात येतील.
12) मागणी केले साहित्य विहित विनिर्देश, गुणवत्तेचे, परिमाणाचे आणि सुस्थितीत प्राप्त झाल्या नंतरच त्याचे बिलाचे रक्कम अनुदानाच्या उपलब्धतेच्या अधीन राहून पुरवठादारास वाजवी कालावधीत अदा करण्यात येईल.
13) पुरवठा दाराने मागणी केलेले साहित्य स्वखर्चाने या कार्यालयास पोहोच करावे लागेल. साहित्य पोहोच करताना त्यासोबत पुरवठा केलेल्या साहित्याचे बिल व डिलिव्हरी चलन देण्यात यावे.
14) **दर पत्रकात नमूद करावयाचे दर हे सर्व करांसहीत नमूद करावे. त्यानुसारच स्वीकृत दर पत्रकातील दरानुसारच सबंधित पुरवठादारास रकमेचे प्रदान करण्यात येईल.**
15) दरपत्रक तयार करताना पुरवठा दराने दर पत्रकासोबत अग्रेषण पत्रामध्ये (FORWARDING LETTER) या पत्राचा संदर्भ द्यावा. तसेच या पत्रामधील सर्व अटी व शर्ती पुरवठादारास मान्य असल्याचे स्पष्टपणे नमूद करावे.
16) दरपत्रक मंजूर करणे बाबतचा अंतिम निर्णय हा दरपत्रक समितीचा अंतिम असणार आहे.
17) नियुक्त होणाऱ्या पुरवठादारास काम समाधानकारक असल्यास पुढील कालावधीसाठी मुदतवाढ देण्याबाबतचे अधिकार मा. महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे राखून ठेवले आहेत.

29.08.2020.

**(मिलिंद बोंगाळे)**
**अधीक्षक अभियंता तथा**
**उपमुख्य कार्यकारी अधिकारी,**
**पुमप्रविप्रा, प्रशासन, पुणे.**

Scanned with CamScanner

## झेरॉक्स रिम पेपर सूची

| अ.क्र. | खरेदी प्रकार | Rate per Unit | GST | Total |
|---|---|---|---|---|
| 1 | झेरॉक्स रिम पेपर - A4<br>७० GSM | | | |



Scanned with CamScanner